सकाळ
नागपूर, गुरुवार, २६ ऑक्टोबर २००६

थेट भेट



जे. जॉन
संयोजक, असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा राष्ट्रीय परिषद

# सामाजिक सुरक्षेसोबत रोजगार हमीही आवश्यक

असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा कायदा या विषयावर देशभरातील १४ स्वयंसेवी संस्था आणि संघटनांतर्फे पहिले राष्ट्रीय संमेलन उद्या (ता.२६) उपराजधानीत होत आहे. यानिमित्ताने परिषदेचे संयोजक जे. जॉन यांच्याशी साधलेला हा संवाद.

■ **केंद्र सरकारचा प्रस्तावित कायदा सामाजिक सुरक्षेचा की आर्थिक सुरक्षेचा?**

प्रस्तावित कायदा सर्वसमावेशक असावा, अशी मुख्य मागणी सर्वच कामगार संघटनांनी केली होती. मात्र, २००० साली दुसऱ्या राष्ट्रीय कामगार आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या कायद्यात सामाजिक सुरक्षेला कमी दर्जा देत आर्थिक सुरक्षेवर भर देण्यात आला. कायदा सर्वच बाजूने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी फायद्याचा असावा या भूमिकेवर सरकार ठाम राहिले नाही.

■ **देशातील किती क्षेत्रात असंघटित कामगार असून, त्यांची संख्या किती?**

देशात ४० कोटी कामगार या क्षेत्राशी निगडित आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारचे सुरक्षा कवच नाही. कंत्राट, नैमित्तिक कामगार आणि स्वयंरोजगार करणारे कामगारही याच वर्गात मोडतात. त्यामुळे कंपनी कायद्यांतर्गत येणाऱ्या सर्वच प्रतिष्ठानांसह बांधकाम आणि अंगमेहनती क्षेत्रातील मजूर या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतात.

■ **कायद्यात सुरक्षेसोबतच रोजगाराच्या संधीचा किती अंतर्भाव असावा?**

कामाची सुरक्षा मिळावी, ही सर्वच स्वयंसेवी संस्था/संघटनांसह कामगार संघटनांची प्रमुख मागणी आहे. याशिवाय कामाची शाश्वती, किमान वेतन आदींबाबतही ठोस भूमिका आहे. प्रस्तावित कायद्यासह जुन्या कायद्यातही या बाबींकडे दुर्लक्ष केल्या गेले, हे दुर्दैव आहे.

■ **जनआंदोलनाची भाषा होत असताना परिषदेचे त्यादिशेने काय संकेत आहेत?**

जनआंदोलनाचा दबाव हा कामगारांच्या हिताचा असल्याने याशिवाय सरकार निर्णय घेणार नाही हे गृहीतच आहे. तत्पूर्वी, परिषदेतून या क्षेत्रासंबंधी अधिक जागृती व्हावी ही यामागची भूमिका आहे. परिषदेनंतर यासंदर्भात स्वयंसेवी संस्था, संघटनांसह कामगार संघटनांनीही ठोस निर्णय घ्यावा ही अपेक्षा आहे. यासंदर्भात केंद्र सरकारशी चर्चा करण्यात येईल आणि सरकारने घूमजाव केल्यास त्यानंतर जनआंदोलनातून त्यादिशेने निश्चितच मार्ग काढण्यात येईल.

■ **या कायद्याबाबत राजकीय पक्षांसह त्यांच्या संलग्नित कामगार संघटना निराशावादी नाहीत का?**

प्रस्तावित कायद्याबाबत सर्वांनी जागरूक होणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्थांनी संघटितपणे यासाठी लढा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. राजकीय पक्षांच्या संलग्नित संघटनांना परिषदेत सहभागी होण्याचे निमंत्रण नाही. मात्र, त्यांनीही या कायद्याबाबत लढण्याचे संकेत दिले आहेत.

■ **कामगार कायद्यांचा प्रभाव केवळ कंपन्यांच्या हितापुरता वाटत नाही का?**

कामगार संघटनाच नव्हे तर कंपन्यांच्या व्यवस्थापनानेही कामगार कायद्यात बदलाची मागणी केली आहे. मात्र, त्यांना प्रस्तावित बदल त्यांच्या हिताचा हवा आहे. अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनीही या बदलाबद्दल अनुकूलता दर्शविली आहे. तथापि, स्वयंसेवी संस्था, संघटना आणि कामगार संघटनांच्या दबावापुढे त्यांना बदल करणे शक्य झाले नाही.